# शेळ्या-मेंढ्यांमधील गर्भपात प्रतिबंधक उपाय, उपचार, शुश्रूषा व माणसाला असलेला धोका टाळण्याचे उपाय



अखिल भारतीय समन्वित उस्मानाबादी शेळी सुधार प्रकल्प
पशुसंवर्धन विभाग
NARI निंबकर कृषि संशोधन संस्था
फलटण ४१५ ५२३, जि. सातारा
ईमेल nimsheep@gmail.com

जुलै २०१४

# शेळ्या-मेंढ्यांमधील गर्भपात

## प्रतिबंधक उपाय, उपचार, शुश्रूषा व माणसाला असलेला धोका टाळण्याचे उपाय

### प्रस्तावना

शेळी-मेंढी व्यवसाय किफायतशीर होण्याकरिता जास्तीत जास्त करडे/कोकरे विक्रीसाठी तयार होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे शेळ्या-मेंढ्या गाभडणे ही मोठी नुकसानीची बाब आहे. शेळ्या-मेंढ्यांचा गाभणकाळ १४५ ते १५५ दिवसांचा असतो. शेळी-मेंढी गाभण असताना विण्याच्या अपेक्षित कालावधीच्या अगोदर म्हणजेच पूर्ण दिवस न भरता अपुरी वाढ झालेली पिल्ले गर्भाशयातून बाहेर पडण्याच्या क्रियेला 'गर्भपात' असे म्हणतात. गर्भपातानंतर त्या शेळी/मेंढीचे शारीरिक नुकसान तर होतेच. शिवाय त्या जनावरापासून मिळणारे उत्पन्न बुडते व जनावराचे वेत वाया जाऊन जनावर खाली अवस्थेत जास्त दिवस सांभाळावे लागते.

संसर्गजन्य गर्भपात झालेल्या जनावरांपासून इतर निरोगी शेळ्या-मेंढ्यांना संसर्ग होऊन त्या पशुपालकाचा सर्व कळपच बाधित होण्याचा धोका संभवतो. संसर्गजन्य गर्भपाताचा आजार मुख्यत्वे नरांकडून माद्यांमध्ये नैसर्गिक संकरावेळी मोठ्या प्रमाणात पसरतो.

शेळ्या-मेंढ्यांकडून काही वेळा शेळ्या-मेंढ्यांबरोबर काम करणाऱ्या माणसांनाही हा संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे माणसात वारंवार ताप ड्ढेणे, अशक्तपणा, शारीरिक व मानसिक थकवा, आतड्यांचा तीव्र दाह, तसेच गर्भवती स्त्रियांमध्ये क्वचित प्रसंगी गर्भपात अशी लक्षणे दिसू शकतात. ही लक्षणे इतर आजारांमध्येही दिसत असल्याने शेळ्यांपासून संसर्ग होऊन झालेला आजार असे लवकर निदान होत नाही व आजार विकोपाला जाण्याची शक्यता असते. शेळ्यांमधील गर्भपातावरील प्रतिबंधक उपाय, गर्भपातानंतर घ्यावयाची काळजी व उपचार ही बाब त्यामुळे अधिकच महत्त्वाची ठरते.

## शेळ्या-मेंढ्यांमधील गर्भपाताची प्रमुख कारणे

१. संसर्गजन्य कारणांमुळे होणारा गर्भपात
२. इतर बाह्य घटकांमुळे होणारा गर्भपात

### संसर्गजन्य कारणांमुळे होणारा गर्भपात

संसर्गजन्य कारणांमुळे होणारा गर्भपात वेगवेगळ्या जीवाणू अगर विषाणू व एकपेशीय जंतूंमुळे होतो. ब्रुसेलोसिस, लिस्टिरिओसिस, व्हिब्रिओसिस, टॉक्सोप्लाझमोसिस, क्लॅमिडिया, ब्लूटंग हे रोग संसर्गजन्य गर्भपातास कारणीभूत प्रमुख रोग आहेत व त्यांपासून माणसांना संसर्ग होऊ शकतो. अशाप्रकारच्या गर्भपातामध्ये सहसा खालील लक्षणे

आढळतात. गर्भपाताच्या काही तास अगोदर खालील क्र.१–३ ही लक्षणे दिसायला सुरुवात होते.

१. शेळी–मेंढीच्या शरीराचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते म्हणजेच १०३°F (३९.५°c) पेक्षा जास्त ताप येतो.

२. शेळी कण्हते व पोटात दुखत असल्याची लक्षणे दाखवते. (हातपाय ताणणे, ओरडणे, ऊठबस करणे)

३. योनीमार्गातून लालसर स्त्राव येतो.

४. शेळी वेणा घालते. यावेळी पूर्ण वाढ न झालेला गर्भ किंवा अशक्त करडे जन्माला येतात. बऱ्याच वेळा निपजलेल्या करडांच्या अंगावर केस नसतात.

५. लिस्टिरिओसिस सारख्या जीवाणूमुळे होणाऱ्या गर्भपातामध्ये जास्त ताप येतो. जनावरे गोल गोल फिरतात. तसेच जीभ, कान व पापण्यांच्या हालचालींवर नियंत्रण राहत नाही.

६. गर्भपात शेळी–मेंढीच्या गाभण काळाच्या सुरुवातीला (दीड ते दोन महिने) किंवा शेवटी (साडेतीन ते साडेचार महिने) होणार हे संसर्गजन्य गर्भपाताच्या कारणावर अवलंबून असते. उदा. व्हिब्रिओसिस मध्ये गाभण काळाच्या सुरुवातीला व ब्रुसेलोसिस मध्ये गाभण काळाच्या शेवटी गर्भपात होतो.

७. कधी कधी गर्भपात झाल्यानंतर गर्भ गर्भाशयातून बाहेर न येता मृत अवस्थेत तसाच गर्भाशङ्गात राहतो. ह्याला 'ममी' गर्भ असे संबोधतात. अशा वेळी शेळी/मेंढी वांझ होते व पुन्हा गाभण राहण्याची शक्यता नसते.

८. शेळ्या–मेंढ्यांचा गर्भपात झाल्यानंतर काही वेळा वार ४ ते ६ तासात न पडता उशीरपर्यंत तशीच लोंबकळताना दिसते. अशा वेळी वार ओढण्याचा प्रयत्न करू नये. शेळ्या/मेंढ्यांना ल्युकोसूल/एम टू टोन/एक्झापार ह्या सारखी वार पडण्यास मदत करणारी औषधे पाजावीत.

९. बाधित नर व माद्यांमध्ये सांधे सुजणे हे लक्षण काही वेळा आढळते. तसेच काही बाधित नरांमध्ये अंडाशय सुजलेले दिसते (Orchitis).

१०. संसर्गजन्य गर्भपातामध्ये वार व निपजलेल्या भ्रूणावर बऱ्याचवेळा लाल, पिवळे किंवा काळपट चट्टे किंवा पिवळसर दह्यासारखा वास येणारा स्त्राव दिसतो.

**टीपः**

वरील लक्षणांपैकी बरीच लक्षणे ही इतर आजारांशी संबधित असू शकतात. (उदा. ताप

येणे.) त्यांचा संबंध संसर्गजन्य कारणांमुळे होणाऱ्या गर्भपाताशी आहे का हे काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. यासाठी शेळ्यांच्या ङ्ग लनाच्ङ्गा, वेताच्या व उपचाराच्या नोंदींची तसेच अशा बाधित जनावरांमधील अनुभवाची गरज आहे.

साधारणतः शेळ्या–मेंढ्यांमध्ये होणाऱ्या एकूण गर्भपातांपैकी फक्त ३०% संसर्गजन्य कारणांमुळे होतात तर उरलेले ७०% इतर घटकांमुळे होतात.

## संसर्गजन्य गर्भपाताच्या प्रसाराची कारणे

१. शेळ्या–मेंढ्यांची वाडगी, बांधण्याची जागा या ठिकाणी गर्भपातानंतर पडलेली घाण, रक्त, स्त्राव, गर्भ याद्वारे निरोगी जनावरांमध्ये ह्या रोगांचा प्रसार होतो.

२. बाधित नरांमार्फत निरोगी माद्यांमध्ये संकराच्या वेळी प्रसार होण्याचा सर्वात जास्त धोका असतो.

३. गर्भपात झालेल्या जनावरांचे दूध निरसे (न उकळता) प्यायल्यास किंवा अनवधानाने शरीरात गेल्यास (उदा. माणसांमध्ये डोळे आल्यास शेळ्यांचे कच्चे दूध डोळ्यात सोडले जाते) हा आजार माणसांमध्येसुद्धा संक्रमित होऊ शकतो.

४. मटण व्यवसायात काम करणाऱ्यांकडून बाधित जनावरे कापल्यानंतर त्ङ्गांच्ङ्गा ङ्गांसाशी संपर्क आल्ङ्गास व स्वतःची योग्य प्रकारे स्वच्छता न ठेवल्यास त्यांना सुद्धा हा आजार संक्रमित होतो.

५. शेळ्या–मेंढ्यांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनी काम केल्यानंतर हातपाय साबणाने स्वच्छ धुतले नाहीत तर त्ङ्गा निरोगी माणसांमध्ये हा आजार संक्रमित होतो.

६. शेळ्या–मेंढ्यांच्या गव्हाणींच्या आसपास गाभण मांजरीचा वावर असेल तर तिच्या विष्ठेद्वारे टॉक्सोप्लाझमोसिस सारख्या संसर्गजन्य गर्भपाताच्या रोगजंतूंचा प्रसार निरोगी शेळ्या–मेंढ्यांमध्ये होतो.

### इतर बाह्य घटकांमुळे होणारा गर्भपात

संसर्गजन्य कारणाव्यतिरिक्त इतर अनेक कारणांमुळे शेळ्या–मेंढ्यांमध्ये गर्भपात होऊ शकतो. खरेतर साधारणतः १०% शेळ्या/मेंढ्या एरवीच गाभडतात व त्यातल्या बहुसंख्यांच्या गर्भपाताला बाह्य घटकच कारणीभूत असतात. ह्यातली बरीचशी कारणे मानवनिर्मित आहेत.

### १. चुकीचा/अयोग्य उपचार

काही आजारांमध्ये स्टिरॉईड सारख्या औषधांचा वापर गाभणकाळात केला गेल्यास अशा जनावरांमध्ये गर्भपात होतो.

**२. ताणतणाव**

गाभणकाळात विविध प्रकारच्या ताणतणावांमुळे गर्भावस्थेच्या कोणत्याही कालावधीमध्ये गर्भपात होण्याची शक्यता असते. ताणतणावामुळे शेळीच्या शरीरातील संप्रेरकांच्या (प्रोजेस्टेरॉन) पातळीवर परिणाम होतो. त्यामुळे संप्रेरकांचे असंतुलन होऊन गर्भपात होतो. संप्रेरकांचे असंतुलन होऊन शेळ्यांमधील गर्भपाताचे प्रमाण मेंढ्यांपेक्षा सहसा जास्त असते.

**खालील प्रकारच्या ताणतणावांमुळे शेळी/मेंढीमध्ये गर्भपात होतो.**

- **जागाबदल :** एखाद्या ठिकाणी नवीन आणलेल्या शेळ्या अगोदरच्या शेळ्यांबरोबर लवकर रुळत नाहीत. त्यामुळे पाठीमागे राहणाऱ्या, घाबरणाऱ्या शेळ्या उपाशी राहून उपासङ्कारीङ्कुळे गाभडू शकतात. शेळ्यांचे वर्गीकरण करताना एका वाडग्यातून दुसऱ्या वाडग्यात हलविल्यास काही शेळ्या अस्वस्थ होतात व इतर मारकुट्या शेळ्यांना घाबरून पाठीमागे उभ्या राहतात. अशा शेळ्या उपासमारी झाल्याने गाभडू शकतात.
- गाभणकाळात दूरवरच्या प्रवासाचा पडलेला ताण व झालेली दगदग गर्भपातास कारणीभूत ठरू शकते.
- शेळ्यांमधील आपापसातील मारामारीमध्ये गाभण शेळीच्या पोटावर धडक बसल्यानेसुद्धा गर्भपात होऊ शकतो.
- एखाद्या व्यक्तीने मारणे, कुत्री/लांडग्यांनी पाठलाग करणे, कळपात रात्री एकदम गोंधळ उडाल्यास घाबरल्यानेसुध्दा गर्भपात होण्याची शक्यता असते.
- शेळी–मेंढी पालकाचे जर कळपाकडे दुर्लक्ष झाले व जनावरांना वेळच्यावेळी चारापाणी मिळाले नाही (खाण्यापिण्यास आचकणे) तर त्या ताणामुळेसुध्दा जनावरे गाभडतात.

**३. आहार**

- सलग बरेच दिवस गाभण शेळ्या–मेंढ्यांना पोषक आहार न मिळाल्यास शेळ्या–मेंढ्यांमध्ये गर्भपात होऊ शकतो. उदा. खनिजांच्या अभावामुळे दीड ते दोन महिन्यांच्या गाभण कालावधीमध्ये गर्भपात होतो.
- तांबे (कॉपर) आणि आयोडीनच्या कमतरतेमुळे करडे मेलेली किंवा मरतुकडी/अशक्त जन्मणे ही लक्षणे दिसतात.
- दुष्काळामुळे अनेक दिवस जर आहारात जीवनसत्वाचा अभाव राहिला तर गर्भपात होणे, वार अडकणे, पिल्ले जन्मतः मरणे (stillbirth) अशा प्रकारची लक्षणे आढळतात.
- शेळी किंवा मेंढीच्या गर्भाशयात किती करडे/कोकरे आहेत त्यानुसार

शेळी/मेंढीला पौष्टिक चाऱ्याबरोबर जास्त खुराकाची गरज असते. ही गरज पूर्ण न झाल्यास शेळी/मेंढीचा गर्भपात होऊ शकतो.

### ४. वयाने लहान असलेल्या पाटी ड्ढ ळून गाभ जाणे

बऱ्याच वेळा लहान मोठ्या सर्वच शेळ्या बोकडांबरोबर चरायला सोडल्या जातात. अशावेळी वयाने लहान (एक वर्षापेक्षा कमी) पाटी माजावर आल्यावर बोकडांकडून संकरण होते व बारकाळ कमी वजनाची करडे निपजतात. काही वेळा त्ङ्गांच्ङ्गा गर्भाशयाचा आकार लहान असल्याने अशा पाटी गाभडतात व पुढे ह्या शेळ्या बारकाळ, खुज्या राहून त्यांची उत्पादनक्षमता घटते.

### ५. गर्भाची विकृती

गर्भाशयात विचित्र प्रकारचे गर्भ तयार झाल्यास उदा. चार पेक्षा जास्त पाय, दोन डोकी, मोठे पोट, मोठे डोके यामुळे सुद्धा गर्भपात होतो. शिवाय असा गर्भ/करडे बाहेर पडताना शेळ्या-मेंढ्यांना खूप त्रास होतो. अनुभव नसलेल्या व्यक्तीकडून अशावेळी हाताळणी केल्यास शेळी मरू शकते.

### ६. विषबाधा

प्रत्यक्ष चाऱ्यामधून तसेच विषारी औषध फवारलेला चारा खाण्यात आल्याने अथवा अन्य मार्गाने विषबाधा झाल्यावर जनावर कुचंबून जनावरांमध्ये गर्भपात होऊ शकतो.

## गर्भपातानंतर घ्यावयाची काळजी

१. गर्भपात झालेले जनावर निरोगी जनावरांच्या कळपातून २-३ आठवडे बाजूला काढावे. त्यासाठी चाऱ्याची स्वतंत्र व्यवस्था करावी.
२. गर्भपात झालेल्या शेळी/मेंढीच्या शेपटी व बाजूचे केस कात्रीने कापून पाठीमागील भाग कोमट पाण्याने साफ करावा. माशी बसू नये म्हणून कापूर व गोडे तेल लावावे किंवा टॉपिक्युअर सारखा स्प्रे मारावा.
३. गर्भपातानंतर पडलेली घाण, वार, गर्भ जाळून टाकावा. ज्या जागेवर गर्भपात झाला असेल ती जागा वाळलेले गवत/पाचट किंवा शक्य झाल्यास फ्लेमगनने जाळावी.
४. जनावरास चारा पाणी टाकण्याचे काम निरोगी कळपामध्ये आधी करावे व नंतरबाधित कळपात जावे. जनावरांची हाताळणी करताना प्लॅस्टिक हातमोजे, पायात बूट घालून तसेच तोंडास रुमाल/मुखवटा (मास्क) बांधून व चष्मा घालून साफसफाई करावी. काम झाल्यानंतर वापरलेले हातमोजे, मास्क व इतर साहित्य जाळून टाकावे.

५. बाधित झालेल्या जनावरांबरोबर काम करून झाल्यावर हातपाय स्वच्छ पाणी व डेटॉल/लाइफबॉय यासारख्या साबणाने २-३ वेळा धुवावेत.

६. कळपाच्या सर्व प्रकारच्या नोंदी ठेवाव्यात. पैदाशीच्या नोंदींमधून एखादे जनावर वारंवार गाभडत असल्याचे लक्षात आले तर ते बाधित असल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा जनावरांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी.

७. दीर्घपरिणामी प्रतिजैविक इंजेक्शनचा बाधित जनावरांना किमान २-३ आठवडे उपचार दर ३ दिवसांच्या अंतराने करावा.

## शेळ्या/मेंढ्यांमध्ये गर्भपात होऊ नये ह्यासाठी करावयाचे प्रतिबंधक उपाय

१. बाह्य कारणांमुळे गर्भपात होण्यामागची बरीचशी कारणे मानवनिर्मित आहेत. त्यामुळे व्यवस्थापनात सुधारणा करणे महत्त्वाचे आहे.

२. गाभणकाळात जनावरांना पुरेसा पौष्टिक खुराक द्यावा. तसेच शेळ्यांच्या आहारात अचानक बदल करू नये. शेळी विण्याच्या एक महिना अगोदर व दोन महिने नंतर मूठभर ड्डक्याचे दाणे दररोज दिल्यास करडांची वाढ चांगली होते.

३. जनावरांना गोठ्यात क्षारमिश्रण किंवा चाटण विटा टांगाव्यात.

४. शेळ्या-मेंढ्यांच्या शारीरिक अवस्थेनुसार (उदा. गाभण, व्यायलेली, खाली) त्यांचे वेगवेगळ्या वाडग्यात वर्गीकरण करावे लागते. अशा वेळी मारकुट्या शेळ्या बाजूला काढून लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

५. शेळ्या-मेंढ्यांच्या कळपाशेजारी फटाके वाजवू नयेत. मोठ्या आवाजामुळे शेळ्या/मेंढ्या घाबरून गर्भपात होऊ शकतो.

**वारंवार कळपात गर्भपात होत असल्यास कळपातील बोकड व शेळ्यांची संसर्गजन्य गर्भपातास कारणीभूत होणाऱ्या रोगाविषयी चाचणी करावी.**

**ही चाचणी खालील ठिकाणी केली जाते.**

१. सहआयुक्त, पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे ४११ ००७ दूरध्वनी क्र.- ०२०-२५६९२१३५

२. केंद्रीय शेळी संशोधन संस्था,(केंद्रीय बकरी अनुसंधान संस्थान) मखदूम, पो. फरहा, मथुरा (उत्तर प्रदेश), दूरध्वनी क्र.- ०५६५-२७६३३८०/२७६३२४५

## निंबकर कृषी संशोधन संस्थेच्ङ्मा पशुसंवर्धन विभागाकडील उपलब्ध सेवा

- अत्युच्च उत्पादनक्षमता असलेल्या उस्मानाबादी बोकडांचे ताजे व गोठविलेले वीर्य
- शेळ्यांचे कृत्रिम रेतन
- शेळ्ङ्मा–ङ्केंढ्या एका वेळी ङ्काजावर आणून कृत्रिङ्क रेतनाचे तंत्रज्ञान
- पैदाशीसाठी जुळी कोकरे देण्याचा गुणधर्म असलेले बालिंगे (मेंढे)
- ईदसाठी, जत्रेसाठी व इतर वेळी मटणासाठी बोकड, बालिंगे व कोकरे
- शेळ्यांमधील व्ङ्मवस्थापन कृत्रिम रेतन व प्रथमोपचार प्रशिक्षण वर्ग
- जंतप्रादुर्भावाचे प्रमाण पाहण्यासाठी शेळ्या–मेंढ्यांची लेंडी तपासणी
- शेळी–ङ्केंढीपालनाबाबत सोप्ङ्मा भाषेतील उपङ्कुत पुस्तिका (ङ्कराठी, हिंदी व इंग्रजीङ्कध्ङ्के उपलब्ध)
- चाऱ्ङ्माचे बी व ठोंब
- शेळी–मेंढीपालन मार्गदर्शन व सल्ला

**पशुसंवर्धन विभाग**
**निंबकर कृषि संशोधन संस्था (नारी)**
फलटण ४१५ ५२३, जि. सातारा
फोन ०२१६६ – २६२१०६/२००७८३
**ईमेल** nimsheep@gmail.com